**कृपया प्रसिध्दिसाठी** **27 नोव्हेंबर 2008**

## राम नाईक यांच्याकडून दहशतवादी हल्ल्यांचा निषेध

**मुंबई, गुरुवार :** "मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यांचा मी तीव्र निषेध करतो. हल्ल्यांमध्ये बळी गेलेल्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात मी सहभागी आहे. निदान आता तरी सरकारने डोळ्यांवर ओढलेले कातडे बाजूला सारुन 'ख-या-खु-या' दहशतवाद्यांना पकडावे. देशाची शांतता व ऐक्य भंग पावणार नाही यासाठी युध्दस्तरावर सरकारने कारवाई करावी. अफझलगुरुला ताबडतोब फाशी देऊन दहशतवादाविरुध्द पहिले पाऊल केंद्र सरकारने उचलले पाहिजे", अशा शब्दात माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी मुंबईतील हल्ल्याचा निषेध केला.

**(कार्यालय सचिव)**